Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# समाज परिवर्तनात महात्मा ज्योतीबा फुले यांचे कार्य

**प्रा.डॉ.मीना भगवानराव बोर्डे**
जालना समाजकार्य महाविद्यालय.
जालना

**प्रस्तावना-**

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात समाजसुधारक होऊन गेले.त्यात महात्मा ज्योतिबाचे स्थान वेगळे प्रकारचे आहे. इतर समाजसुधारकांनी आणि विचारवंतानी सामाजिक प्रश्नांकडे थोडयाश्या अंतराने पाहिले.पण फुले मात्र हयात प्रत्याक्षात सामाजिक संघर्षात उभे होते. इतरांची भूमिका प्रबोधक व सुधारकांची होती. फुलेंनी केवळ प्रबोधक व सुधारक नव्हते.ते एक चिंतनशिल सामाजिक क्रांतीवाधाची भूमिका स्विकारली होती.इतर विचारवंतानी केवळ प्रबोधन म्हणजे परिवर्तन नव्हे. फुले यांनी प्रत्यक्ष कार्य करुन समाजात सुधारणा व परिवर्तन घडून आणले. महात्मा ज्योतिबा फुले यांनी प्रत्यक्ष कार्य करुन समाजात सुधारणा व परिर्वतन घडून आणले.महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिक्षण नसेल तर काय होते विद्येविना मति गेलीय, मतिविना नीती गेलीय, नितिविना गति गेली ,गतिविना वित्त गेले, वित्तविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.अज्ञान हे गरिबी व शोषणाचे मूळ कारण आहे.येथील जातीव्यवस्थेत महिलांवर सतत अन्याय अत्याचार केले. महिलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी १८४८ मध्ये पहिली मुलीची शाळा काढली इतिहासात हे वर्ष क्रांतीकारक ठरले.

**उद्देश-**

१ महात्मा ज्योतिबा फुले यांनी केलेल्या स्त्रीकल्याणांच्या कार्याचा आढावा घेणे.
२ महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेणे.
३ महात्मा ज्योतिबा फुलेंच्या साहित्याचा आढावा घेणे.

**तथ्यसंकलन-**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी दुय्यम साधनसामुग्रीचा उपयोग केला आहे.यात विविध लेखकाची संदर्भग्रंथ,पुस्के मासिके तसेच इंटरनेट चा उपयोग केला आहे.

**१. महात्मा ज्योतिबाचे स्त्री कल्याणाचे कार्य :-**

महात्मा ज्योतिबा फुले यांनी महिला स्त्रीकल्याणाचे पहिले पाऊल उचलले.महिलांचे कल्याण करायाचे असेल तर तिला शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी त्यांनी पहिली मुलींची शाळा १८४८ मध्ये भिडयाच्या वाडयात सुरु केली.त्याअगोदर त्यांनी पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण दिले.त्यांना शिक्षिका बनविले व मुलींना शिक्षण देत आसतांना समाजातील लोकांचा त्यांना विरोध व त्रास सहन केला परंतु मुलींना शिकविण्याचा कामात खंड पडू दिला नाही.ज्योतिबा फुले यांनी नॉर्मल स्कूल काढले त्यामधून ट्रेंड झालेल्या पहिल्या मुस्लीम विद्यार्थी फातिमा शेख होय.फुले दांमपत्यांने पुर्नविवाचा पुरुस्कार केला.विधवांसाठी बालहत्या प्रंतिबंधक गृहाची स्थापना केली.व प्रस्ध्दिीसाठी त्यांनी परिपत्रके लावली त्यात त्यांनी स्पष्टपणे लिहले होते विधवांनो येथे गुप्तपणे येऊन बांळत व्हावे मुल न्यायचे की येथेच ठेवायचे हे त्यांच्या वर अवलंबून राहित.पण त्या बाळाची काळजी आश्रम घेईल.शनवी जातीत एका विधवेचा विवाह घडवून आणला.बहुपत्नीला विरोध ,बालविवाह, जरठ विवाह, सतीप्रथा, बाल जरठ विवाहाने विधवांचे संख्येत वाढ होत होती.त्यामुळे त्यांनी विवाहास विरोध केला.बालहत्या प्रतिबंधक गृहात काक्षीबाई नावाच्या एका विधवेने मुलाला जन्म दिला तो मुलगा दत्तक घेतला त्यांचे नांव यशवंत होते.त्यालासुध्दा डॉक्टर बनविले व त्याला समाजसेवेचे बाळकडू पाजले.

**२. महात्मा ज्यातिबाचे सामाजिक कार्य:-**

आधुनिक महाराष्ट्राच्या मूलगामी सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे आधप्रर्वतक महात्मा ज्योतिबा फुले होय.स्त्रीशिक्षण बालविवाह, विधवा पुर्नविवाह ,जरठ विवाह, केशवपन इत्यादीवर कार्य केले.ईश्वरांने सर्व स्त्री पुरुषांना एकदंर सर्व मानवी अधिकार दिले आहे.स्वातंत्र हा व्यक्तिमत्वाचा मूलभूत हक्क आहे.भारतातील व्यवस्थेने पुरुषप्रधान संस्कृतिने स्त्रीला हक्क मिळू दिले नाहीत आणि त्या हक्कासाठी स्त्रीयांनी या व्यवस्थेविरुध्द आवाज उठविला पाहिजे.यासाठी प्रत्यक्षपणे कार्यकेले स्त्रीयासंबधित विचार व्यक्त करतांना सर्व प्राण्यात माणूस श्रेष्ठ आहे.पुरुषापेक्षा स्त्री सर्वश्रेष्ठ आहे असे ज्योतिबा फुले म्हणतात.भारतीय समाजातील वर्णव्यवस्थेचे उत्पती संबधीचे वेद स्मृती पुराणातील उल्लेख यांचा आधार घेऊन वर्णव्यवस्थेवर प्रहार केला.वर्णव्यवस्था पक्षपाती व अन्यायकारक आहे असे फुले म्हणतात.त्यांनी समाजात बदल घडवून आणण्यासाठी सामाजिक कार्य त्याचे विवेचन पुढीलप्रमाणे आहे.

- ❖ ऑगस्ट १८४८ मध्ये पुणे येथे बुधवार पेठेत भिडे यांच्या वाडयात मुलींची पहिली शाळा सुरु केली.
- ❖ १७ सप्टेंबर १८५१ रोजी रास्ता पेठेतील मुलींची दुसरी शाळा सुरु केली.

- १८५२ मध्ये दलितांना शिक्षण देणेसाठी पहिली शाळा सुरु केली.
- १८५५ मध्ये रात्रीची शाळा सुरु केली.
- १८६३ मध्ये राहत्या घरात बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली.
- १८६४ मध्ये पुण्यात एक पुर्नविवाह घडवून आणला.
- १८६८ मध्ये स्वत:च्या घरातील पिण्याच्या पाण्याचा हौद अस्पृयाना खुला करुन दिला व पंरपरागत रुढींना धक्का दिला.
- शेतकऱ्याचा असूड या आपल्या ग्रंथात त्यांनी शेतऱ्यांचे विदारक चित्र रेखाटून शिक्षाच्या अभावी समाजाची स्थिती मांडली.
- शिक्षण वस्तीगृह सिंचन धरणे तलाव विहिरी यासारखे उपाय सुचविले.
- सुधारणावादी विचारांचा प्रसार करण्यासाठी कृष्णराव भालेकर यांच्या मदतीने पुण्यातून दीनबंधू वृत्तपत्र १८७७ मध्ये सुरु केले.
- २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.
- १८८० मध्ये महात्मा फुले यांनी कामगाराच्या प्रश्नाची वाचा फोडण्यासाठी नारायण मेघाजी लोंखडे यांच्या माध्यामातून बॉम्बे मिल असोसिअशन या संघटनेची स्थापना केली.
- इ.स.१८८८ मध्ये व्हिक्टोरीया राणीच्या चिरजींवाच्या कार्यक्रमात त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रतिनिधी म्हणून शेतकऱ्यांचे ग्राऱ्हाणे मांडले.
- महात्मा फुले यांनी हंटर कमिशनपुढे प्राथमिक व माध्यामि शिक्षण मोफत व सक्तीचे करावे अशी आग्रहाची मागणी केली.
- महात्मा ज्योतिबा फुले यांनी समाजसुधारणेसाठी प्रत्यक्ष कार्य केले त्यांचा सन्मान म्हणून १८८८ ला त्यांना जनतेने महात्मा ही पदवी दिली.

### ३. महात्मा ज्योतिबा फुलेंचे साहित्य :-

महात्मा ज्योतिबा फुलेंचे साहित्य वास्तववादी व समाजातील समस्यावर उपाय सुचविणारे होते.समाजातील सत्य परिस्थिती त्यांनी त्यांच्या लिखनात मांडली.ब्राम्हणाचे कसब व शेतकऱ्यांचा असूड यात धर्माच्या नावाखाली व अज्ञान यामुळे ब्राम्हण शुद्राची व गरिब लोकांचे शोषण कसे करतात याविषयी विचार व्यक्त करतात शेतकऱ्यांचा असूड या पुस्तकात शेतकऱ्याची दुर्दशा आणि दारिद्रयासाठी वास्तविकता विशद केली आहे.या पुस्तकादारे विशाल दृष्टीकोनाचा क्रातीकारक म्हणून त्यांचे दर्शन होते.नीती हाच मानवी जीवनाचा आधार आहे.हा विचार मांडणारे ज्योतिबा एक तत्वचिंतक व्यक्तिमत्व होते. शेतकऱ्याचा असूड लिहून खऱ्या अर्थाने त्यांनी समाजप्रबोधन केले.मूलभूत मानवी हक्कांच्या आधारावरुन विश्वकुंटूब कसे निर्माण होईल.त्याकरिता कशा प्रकारचे वर्तनक्रम व वैचारिक भूमिका स्वीकारली पाहिजे ज्योतिबांनी

सार्वजनिक सत्यधर्म यात संहितेत अनेक आधार देवून मांडणी करतात.सार्वजनिक सत्यधर्म हा सत्यशोधक समाजाचा प्रमाणग्रंथ होय.यात धर्मपुस्तक पूजा, नामकरण, नवैध, धर्मनीती देव, सत्य, स्वर्ग ,पुत्र यांच्या संस्कार लग्नविधी, पाप, पुण्य ,मृत्यू ,श्रध्दा इत्यादी विषयावर विचार व्यक्त केले आहे.समाजाचे मुखपत्र म्हणून दीनबंधू साप्ताहित चालविले. तुकारामाच्या अभंगाच्या धर्तीवर त्यांनी अनेक अखंड रचले. आपला गुलामगिरी हा ग्रंथ अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना त्यांनी समर्पित केला.अस्पृशयांची कैफियत हा महात्मा फुलेंचा अप्रकाशित ग्रंथ होय.सार्वजनिक सत्यधर्म हा त्यांच्या मृत्यूनंतर १८९१ मध्ये प्रकाशित झाला.

**सारांश -**

महात्मा ज्योतिबा फुले यांनी समाजातील व्यवस्थेविरुध्द सतत संघर्ष केला.बोलके सुधारक नव्हते तर कृतीशिल सुधारक होते.समाजात परिवर्तन आणण्यासाठी त्यांनी शैक्षणिक सामाजिक कार्य केलीच परंतू त्यांनी साहित्य समाज उपयोगी व समाजातील विविध समसया सोडविण्यासाठी उपयोगाचे आहे.भारतीय व्यवस्थेने स्त्रीयांवर जी बंधने व अन्याय केला त्याविरुध्द आवाज उठविण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे.हा विचार ठेवूनच त्यांनी महिला कल्याणाचे सर्वसमावेशक सुधारणावादी कार्य केले.समाजपरिवर्तनासाठी जे कार्य केले त्यांचा सन्मान म्हणून त्यांना जनतेने महात्मा ही पदवी बहाल केली होती.

**संदर्भग्रंथ-**

१ महात्मा ज्योतिबा फुले समग्र वाड:मय
२ महात्मा फुले साहित्य आणि चळवळ-हरी नरके
३ महात्मा ज्योतिबा फुले सामाजिक आणि शैक्षणिक कार्य-अ.रा.कुलकर्णी.
४ महात्मा ज्योतिबा फुले आणि स्त्री मुक्तीचा विचार-डॉ.गेल ऑम्व्हेट.
५ www.bookganga.com.
६ http://www.missionmpsc.com